# जिल्हा परिषद, सांगली
## सामान्य प्रशासन विभाग

मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, सांगली - मिरज मार्ग, पुष्कराज चौक, सांगली, ता. मिरज, जि. सांगली

फोन नं. - ०२३३-२३७२७२५ Email ID - deputyceo@ymail.com & deputyceosangali@gmail.com


---

**अभ्यागतांसाठी निश्चीत वेळ राखून ठेवण्याबाबत.**

सांगली जिल्हा परिषद सांगली

परिपत्रक क्र.जिपसा/ साप्रवि/आस्था-०९/कावि/ ६४५ /२०२४

दिनांक:- ३० /०१/२०२४

## परिपत्रक.

उपरोक्त विषयांस अनुसरुन महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र.संकीर्ण्-२०२३/प्र.क्र.०३/१८/(र.व.का), दि.२८/०३/२०२३ चे अवलोकन करावे.

सदर परिपत्रकांचे अनुषगांने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सांगली यांचेकडे येणा-या अभ्यागंतसाठी प्रत्येक **सोमवार व शुक्रवार या दिवशी दु.३.०० ते ५.००** ही वेळ राखून ठेवणेत आलेली आहे.सदर कालावधीमध्ये पुर्वनिर्धारित (With prior appointment) व पुर्वनिर्धारित शिवाय (Without prior appointment) अभ्यांगतास भेट घेता येईल.

तसेच अभ्यागतांच्या तक्रारींची /कामांची दखल घेऊन त्यांचे समाधान करण्याच्या दृष्टीने विभागीय व तालुकास्तरांवरील अधिका-यांनी अभ्यागतांना भेटीसाठी विविक्षीत दिनांक व वेळ राखुन ठेवण्याच्या दृष्टीने खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१.जिल्हा परिषद मुख्यालयातील व तालुकास्तरावरील कार्यालय प्रमुख्यांनी जनतेच्या भेटीसाठी आठवडयातून किमान दोन दिवस निश्चीत करुन ठराविक वेळ राखून ठेवावी.ही वेळ दुपारनंतर ठेवण्यात यावी.या राखीव वेळेत शक्यतो बैठकीचे आयोजन करण्यात येऊ नये.

२.जिल्हा परिषद मुख्यालयातील व तालुकास्तरावरील कार्यालय प्रमुख्यांनी कर्तव्यांचा भाग म्हणून दौ-यांचे आयोजन अशा प्रकारे करावे की, लोकांच्या भेटीसाठी राखून ठेवलेल्या वेळेवर त्याचा परिणाम शक्यतो होणार नाही.या दृष्टीने .विभाग व तालुकास्तरावरील अधिका-यांनी कर्तव्यांचा भाग म्हणून करावयाचे दौरे वा भेटी यासाठी आठवडयातील ठराविक दिवस निश्चीत करावेत व त्याची माहिती कार्यालयाच्या सुचना फलकावर प्रदर्शित करण्यात यावी.जनतेस याबाबतची निश्चीत माहिती मिळाल्यामुळे त्यांची गैरसोय होणार नाही.

३.दौरे व भेटीमुळे जर जिल्हा परिषद मुख्यालयातील व तालुकास्तरावरील कार्यालय प्रमुख्यांनी कार्यालयात उपस्थित रहाणे शक्य नसेल तर अशा प्रसंगी जनतेच्या भेटीसाठी पर्यायी व्यवस्था करण्यात यावी.

वरील बाबींच्या अनुषगांने जिल्हा परिषद मुख्यालयातील विभागप्रमुख व तालुकास्तरांवरील कार्यालय प्रमुख यांना सुचित करणेत येते की, अभ्यागतांना भेटीचा दिनांक व वेळ निश्चीत करुन तसा फलक कार्यालयाच्या दर्शनी भागामध्ये प्रदर्शित करावा व तसा अहवाल या कार्यालयास सादर करणेत यावा.

**तृप्ती धोडमिसे (भा.प्र.से)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद सांगली**

**प्रत - माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.**

१) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प., सांगली .
२) प्रकल्प, संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा-सांगली
३) खातेप्रमुख (सर्व)-----------------------------------, जिल्हा परिषद, सांगली.
४) गट विकास अधिकारी पंचायत समिती----------------